Pariwar

# MPSC




# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)

Headlines: २५ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२०

४ मार्च २०२०

# हेडलाईन्स

## भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर

- नुकतेच ब्रिटन व फ्रान्सला मागे टाकून भारतीय अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आली.
- सेवा क्षेत्रात होणारा वेगवान विकास यामुळे भारताने ही प्रगती साधली असे अमेरिकन थिंक टँक वर्ल्ड पॉप्युलेशन अहवाल 2019 मध्ये सांगण्यात आले.

**जागतिक अर्थव्यवस्थांची क्रमवारी :**

1) अमेरिका 2) चीन 3) जपान
4) जर्मनी 5) भारत

**या अहवालातील ठळक बाबी :**

- 1990 नंतर भारताने मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली व त्यामुळे जागतिक निकषांनुसार भारतीय अर्थव्यवस्था चालते.
- भारतातील सेवा क्षेत्राचा विकास वेग हा अन्य कोणत्याही देशाच्या सेवा क्षेत्राच्या विकास दरापेक्षा जास्त आहे.

**महत्त्वाची आकडेवारी :**

- **भारताचा विकासदर :**

| | |
|---|---|
| 2016-17 | 8.2 % |
| 2017- 18 | 7.2 % |
| 2018-19 | 6.8 % |
| 2019- 20 | 5% |
| 2020-21 | 6 ते 6.5% (अपेक्षित) |

- **भारतातील औद्योगिक विकास दर :**

| | |
|---|---|
| 2017-18 | 5.9 % |
| 2018-19 | 6.9 % |
| 2019-20 | 2.5 % ( मोठ्या प्रमाणात घट) |

- **भारतातील कृषी विकास दर :**

| | |
|---|---|
| 2017-18 | 5 % |
| 2018- 19 | 2.9 % |
| 2019-20 | 2.8 % |

(सर्व आकडेवारी आर्थिक पाहणी अहवाल 2019-20 नुसार)

**महत्त्वाचे**

- 2019 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार हा 2.9 ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स इतका आहे व 2024-25 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर्स एवढा अर्थव्यवस्थेचा आकार करणे हे लक्ष्य आहे.

## अमेरिका भारताचा सर्वोच्च व्यापारी भागीदार देश

- चीनला मागे टाकून अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदारी देश बनला आहे.
- एप्रिल ते डिसेंबर 2019 या काळात चीनचा भारतासोबतचा व्यापार घटून 65 अब्ज डॉलर्स एवढा झाला. इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिक वस्तूंच्या आयातीत घट झाली. त्यामुळे चीनला मागे टाकून अमेरिका भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदारी देश बनला आहे. भारताची अमेरिकेला होणारी निर्यात तसेच अमेरिकेतून होणारी आयात वाढली. त्यामुळे दोन्ही देशांचा व्यापार 68 अब्ज डॉलर्स एवढा झाला.
- भारताचा जागतिक व्यापारातील वाटा केवळ 2 टक्के आहे.
- आकडेवारी आर्थिक पाहणी अहवाल 2019-20 नुसार, भारताचा अमेरिकेसोबतचा व्यापार (एप्रिल ते डिसेंबर 2019) :

निर्यात - 40 अब्ज डॉलर्स
आयात - 28 अब्ज डॉलर्स

**भारताचे पहिले पाच व्यापार भागीदार देश :**

1) अमेरिका 2) चीन
3) संयुक्त अरब अमिराती 4) सौदी अरेबिया
5) हाँगकाँग

**भारतातून निर्यात होणाऱ्या पहिल्या पाच वस्तू :**

| | |
|---|---|
| 1) पेट्रोलियम पदार्थ | - 13.7% |
| 2) मोती, मौल्यवान खडे | - 7% |
| 3) औषधी उत्पादने | - 5% |
| 4) सोने व इतर धातूंची दागिने | - 4.5% |
| 5) लोह पोलाद | - 3% |

**भारतात आयात होणाऱ्या पहिल्या पाच वस्तू :**

| | |
|---|---|
| 1) कच्चे तेल | - 21% |
| 2) सोने | - 6.4 % |
| 3) पेट्रोलियम पदार्थ | - 5.6% |
| 4) कोळसा व कोक | - 4.8% |
| 5)मोती व मौल्यवान खडे | - 4.6% |

**भारताची निर्यात जीडीपीच्या प्रमाणात (%) :**

2009-14 (15.7 टक्के)

2014 -19 (12.7 टक्के)

2018 - 19 (12.1 टक्के)

**महत्त्वाचे :**

**व्यापारतोल :**

- एका वर्षात देशातून होणाऱ्या निर्यातीच्या व देशात होणाऱ्या आयातीच्या मूल्यांमधील फरक म्हणजे व्यापारतोल होय.

**अनुकूल व्यापारतोल :**

- आयातीपेक्षा निर्यातीचे प्रमाण अधिक असते तेव्हा व्यापारतोल अनुकूल असतो.
- भारत स्वतंत्र झाल्यानंतर केवळ दोनच वेळा भारताचा व्यापारतोल हा अनुकूल होता.

1)1972-73 2)1976-77

**प्रतिकूल व्यापारतोल :**

- जेव्हा निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण अधिक असते तेव्हा देशाच्या व्यापारतोल हा प्रतिकूल बनतो.
- भारताचा अमेरिका व संयुक्त अरब अमिराती सोबत व्यापार अधिवेश आहे तर चीन, सौदी अरब, इराक, जर्मनी यांच्यासोबत व्यापारतूट आहे.

## देशातील विदेशी चलन साठा विक्रमी स्तरावर

- रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार 14 फेब्रुवारी रोजी समाप्त झालेल्या आठवड्यात विदेशी चलन साठा 3.091 अब्ज डॉलर्सने वाढून 476.092 डॉलर्स एवढा झाला.
- हा आतापर्यंतचा सर्वाधिक जास्त विदेशी चलन साठा आहे.
- सध्या परकीय चलन साठ्याच्या बाबतीत भारत हा जगात सातव्या क्रमांकावर आहे.

**महत्त्वाचे :**

- देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे किंवा चलनविषयक अधिकार असलेल्या प्राधिकरणाकडे असलेले परकीय चलन म्हणजे देशाचा परकीय चलनसाठा (Foreign Exchange Reserve) होय.
- परकीय चलन साठ्यामुळे परकीय व्यापारात तरलता राहते.
- ज्या देशाचा परकीय चलन साठा जास्त असतो त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला सक्षम समजले जाते.
- आर्थिक मंदीच्या परिस्थितीत याचा उपयोग केला जातो.
- 1990- 91 मध्ये भारताचा परकीय चलन साठा हा नीचांकी पातळीवर गेला होता (5.8 बिलियन डॉलर). त्याद्वारे भारत केवळ तीनच आठवडे पेट्रोलियम आयात करू शकत होता.

परकीय चलन साठ्यात पुढील घटक मोजले जातात :

1) मध्यवर्ती बँकेकडे असलेले परकीय चलन
2) मध्यवर्ती बँकेकडील सोने
3) SDR(Special Drawing Rights)
4) RTP(Reserve Tranche Position)

**रिझर्व्ह बँक व परकीय चलन :**

- भारताला मिळालेले परकीय चलन व भारताच्या मालकीचे सोने सांभाळण्याची जबाबदारी तसेच भारतीय रुपयाचे विशिष्ट विनिमय दराने अन्य परकीय चलनात रूपांतर करण्याचे काम रिझर्व्ह बँक करते.
- परकीय चलनाचे व्यवस्थापन रिझर्व्ह बँकेच्या परकीय चलन विभागामार्फत (FED-UP Foreign Exchange Department) केले जाते.
- परकीय चलनासंबंधित फेमा (FEMA-Foreign Exchange Management Act) कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी रिझर्व्ह बँकेकडे सोपविण्यात आली आहे.
- देशाच्या परकीय चलन साठ्याचा परिरक्षक म्हणून रिझर्व्ह बँक काम करते.
- परकीय विनिमय दर स्थिर ठेवण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर टाकण्यात आली आहे.
- परकीय गुंतवणूक विभागामार्फत (External Investment and Operations Department) रिझर्व्ह बँक परकीय चलनसाठ्यातून परकीय देशांमध्ये गुंतवणूकही करीत असते.

## जगातील सर्वांत प्रदूषित 30 शहरांपैकी 21 शहरे भारतात

- जगातील सर्वांत जास्त 30 प्रदूषित शहरांपैकी 21 शहरे भारतात आहेत. दिल्ली हे सर्वाधिक प्रदूषित राजधानीचे शहर ठरले आहे.
- हवेच्या गुणवत्तेविषयीचा जागतिक अहवाल 2019 मधून हे चिंताजनक वास्तव समोर आले आहे. प्रदूषित शहरांत महाराष्ट्रातील भिवंडीचाही समावेश आहे.
- एक्यू एअर व्हिज्युअल्सने हा अहवाल जाहीर केला.

यानुसार गाझियाबाद हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे.

- सर्वाधिक प्रदूषित देशांच्या यादीत भारत पाचव्या तर बांगलादेश सहाव्या स्थानी आहे.

**सर्वाधिक प्रदूषित शहरे पुढीलप्रमाणे:**

1. गाझियाबाद, भारत
2. होतन, चीन
3. गुजरणवला, पाकिस्तान
4. फैसलाबाद, पाकिस्तान
5. दिल्ली, भारत

**सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी भारतातील 21 शहरे पुढीलप्रमाणे:**

| | | |
|---|---|---|
| गाझियाबाद | लखनऊ | जिंद |
| दिल्ली | बुलंदशहर | फरीदाबाद |
| नोएडा | ग्रेटर नोएडा | कोराऊट |
| गुरुग्राम | मुझफ्फरनगर | भिवंडी |
| बंधवारी | पलवल | बाघपत |
| पाटणा | मुझफ्फरपूर | जोधपूर |
| हिसार | कुटैल | मुरादाबाद |

**सर्वाधिक प्रदूषित देश:**

1. बांगलादेश 2. पाकिस्तान 3. मंगोलिया
4. अफगाणिस्तान 5. भारत

## नवी दिल्लीत राष्ट्रीय सेंद्रिय खाद्यपदार्थ महोत्सवाचे आयोजन

- 21 फेब्रुवारी, 2020 रोजी नवी दिल्लीत 'राष्ट्रीय सेंद्रिय खाद्यपदार्थ महोत्सव'चे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री हरसिमरत कौर बादल ह्यांच्या हस्ते झाले.

**ठळक बाबी**

- अनलिशिंग इंडियाज् ऑरगॅनिक मार्केट पोटेन्शियल हा या महोत्सवाचा विषय आहे.
- महोत्सवात 25 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातल्या 180 पेक्षा जास्त उद्योजिका आणि बचत गट सहभागी झाले होते.
- भारतातली सेंद्रिय बाजारपेठ मजबूत करणे आणि सेंद्रिय उत्पादनांच्या निर्मितीत गुंतलेल्या महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे हे तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचे उद्दिष्ट आहे.
- भारतातली सेंद्रिय बाजारपेठ वार्षिक 17 टक्क्यांच्या वृद्धीने वाढत आहे. लोकांचे आरोग्य सुधारण्यावर भर देण्यात येत असल्याने केवळ सेंद्रिय खतांपासून घेतलेल्या पिकांना सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे.

## AICTE चा 'विश्वकर्मा पुरस्कार 2019'

- 24 फेब्रुवारी 2020 रोजी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री रमेश पोखरियाल निशंक यांच्या हस्ते नवी दिल्लीत 'विश्वकर्मा पुरस्कार 2019' यांचे वाटप करण्यात आले.
- हे पुरस्कार दोन श्रेणींमध्ये देण्यात आले आहे – छात्र विश्वकर्मा पुरस्कार आणि उत्कृष्ट संस्थान विश्वकर्मा पुरस्कार.

**ठळक बाबी**

- विविध गटात एकूण 23 चमूला छात्र विश्वकर्मा पुरस्कार देण्यात आले आहेत. तर 6 संस्थांना उत्कृष्ट संस्थान विश्वकर्मा पुरस्कार देण्यात आला.
- याव्यतिरिक्त, प्रत्येक उपश्रेणीतल्या पहिल्या तीन चमूला प्रशंसा प्रमाणपत्र आणि रोख बक्षीस (51000, 31000 आणि 21000 रुपये) प्रदान करण्यात आले.
- पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) यांच्यातर्फे आयोजित करण्यात आला.

**पुरस्काराविषयी :**

- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) वर्ष 2017 पासून विश्वकर्मा पुरस्कार स्पर्धांचे आयोजन करीत आहे. मान्यताप्राप्त संस्थांच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कल्पक भावना आणि वैज्ञानिक गुण वाढविण्यासाठी या पुरस्काराची स्थापना केली गेली आहे.

**AICTE विषयी :**

- तंत्रशिक्षण क्षेत्रातल्या सुविधांचे सर्वेक्षण करण्यासाठी आणि देशातल्या तांत्रिक शिक्षणाच्या समन्वित आणि समाकलित विकासासाठी राष्ट्रीय पातळीवरची सर्वोच्च सल्लागार संस्था म्हणून 1945 साली अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) याची स्थापना केली गेली.
- मुख्यालय : नवी दिल्ली
- ही संस्था मनुष्यबळ व विकास मंत्रालयाच्या अखत्यारीत

असलेल्या उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेली एक वैधानिक संस्था आणि तांत्रिक शिक्षणासाठी एक राष्ट्रीय परिषद आहे.

## RAISE 2020 : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विषयावरची भारताची पहिली परिषद

- नवी दिल्लीत 11 आणि 12 एप्रिल 2020 रोजी सामाजिक सशक्तीकरणासाठी जबाबदार AI (RAISE - Responsible AI for Social Empowerment) विषयक एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्याचा भारत सरकारने निर्णय घेतला आहे.
- ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित पहिलीच परिषद आहे.
- हा कार्यक्रम भारत सरकारचे इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आयोजित करणार आहे.
- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापराविषयी नागरिक आणि उद्योगांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शिक्षण, स्मार्ट दळणवळण, कृषी, आरोग्य सेवा आणि इतर क्षेत्रात गुंतलेल्या उद्योगांमध्ये सामाजिक सशक्तीकरण आणि परिवर्तनाच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर विचारांची देवाणघेवाण केली जाणार आहे.

## शाळांमध्ये मराठी अनिवार्य

- राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा विषय सक्तीचा करणारे विधेयक विधान परिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले.
- 2020 - 21 या शैक्षणिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने एक सक्तीचा विषय म्हणून सर्व शाळांमध्ये, इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी शिकवण्याची तरतूद या विधेयकात आहे.
- तर येत्या शैक्षणिक वर्षात पहिल्या टप्प्यात इयत्ता पहिली आणि सहावीसाठी मराठी भाषा विषय सक्तीचा केला जाईल.
- त्यानंतर टप्प्याटप्प्याने प्रत्येक वर्षी पुढच्या इयत्तेसाठी लागू करण्यात येईल.
- अशा प्रकारे 2024-25 या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी आणि दहावीसाठी मराठी भाषा विषय अनिवार्य होईल.

## एमईईच्या मूल्यांकनात ठाणेस्थित फ्लेमिंगो वन्यजीव अभयारण्य प्रथम

- 'मॅनेजमेंट इफेक्टिव्हनेस इव्हॅल्यूएशन' या केंद्रीय समितीने राज्यातील अकरा वन्यजीव अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान यांचे केंद्रीय वन्यजीव संस्थेच्या निकषांच्या आधारे मूल्यांकन केले.

**'एमईईने' केलेल्या मूल्यांकनानुसार राज्यातील अभयारण्यांचा क्रम :**

| | |
|---|---|
| 1) फ्लेमिंगो वन्यजीव अभयारण्य | ठाणे खाडी |
| 2) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | बोरिवली (मुंबई उपनगर) |
| 3) मयूरेश्वर अभयारण्य (चिंकारा हरीण) | पुणे (सुपे) |

मूल्यांकन करताना खालील बाबी विचारात घेतल्या गेल्या -

- अभयारण्यातील वन्यजीवांच्या संरक्षणासाठी असलेली यंत्रणा.
- वन व्यवस्थापन.
- वन कर्मचाऱ्यांचा सहभाग इ.

**राज्यातील महत्त्वाची अभयारण्ये व संबंधित जिल्हे :**

| | |
|---|---|
| 1) कर्नाळा (पक्षी) | रायगड |
| 2) देऊळगाव रेहेकुरी (काळवीट) | कर्जत, अहमदनगर |
| 3) माळढोक (पक्षी) | अहमदनगर-सोलापूर |
| 4) जायकवाडी (पक्षी) | औरंगाबाद-नगर |
| 5) भीमाशंकर (शेकरू खार) | पुणे |
| 6) सागरेश्वर (हरीण) | सांगली |
| 7) नायगाव (मोर) | बीड |
| 8) दाजीपूर राधानगरी (गवे) | कोल्हापूर |
| 9) मेळघाट (व्याघ्र प्रकल्प) | अमरावती |
| 10) नांदूर-मधमेश्वर (पक्षी) (नुकताच रामसार यादीमध्ये समावेश) | नाशिक |
| 11) फणसाड | रायगड |
| 12) तानसा, भातसा | ठाणे |
| 13) तुंगारेश्वर | पालघर |

| | |
|---|---|
| 14) नर्नाळा | अकोला |
| 15) चपराळा | गडचिरोली |
| 16) अंधारी | चंद्रपूर |
| 17) यावल | जळगाव |
| 18) किनवट, पेनगंगा, टिपेश्वर | यवतमाळ-नांदेड |
| 19) गौताळा-औतरमघाट | औरंगाबाद-जळगाव |
| 20) येडशी | उस्मानाबाद |
| 21) काटेपूर्णा | वाशिम |
| 22) अनेर धरण | नंदूरबार |

**महत्त्वाचे :**

- 2017 च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात एकूण 58 संरक्षित क्षेत्रांमध्ये 6 राष्ट्रीय उद्याने, 48 वन्यजीव अभयारण्ये व 4 संवर्धन क्षेत्रे आहेत.
- राज्यात 1972 मध्ये वन्यजीव संरक्षण अधिनियम अस्तित्वात आला.
- वन्यजीव सप्ताह - 2 ते 8 ऑक्टोबर
- वनमहोत्सवास सुरुवात - 1952
- महाराष्ट्र वन विकास महामंडळाची स्थापना - 1974
- महाराष्ट्र वन विभागाचे घोषवाक्य - 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे'.

## थाई मागूर मासा

- महाराष्ट्रात या माशाच्या संवर्धनावर बंदी आहे.
- विदेशी थाई मागूर माशांची संगोपन केंद्रे नष्ट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने एक विशेष मोहीम हाती घेतली आहे.
- हा मासा अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्येही वाढू शकतो. तो सर्वभक्षी आहे. त्यामुळे पर्यावरण संतुलनावर व इतर स्थानिक माशांच्या प्रजातींवर त्याचा विपरित परिणाम होत आहे.
- राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार थाई मागूर माशांचे प्रजनन व मत्स्यपालनावर बंदी घालण्यात आली आहे.
- आदेशानुसार, थाई मागूर मासे पूर्णत: नष्ट करावेत. तपासणी पथकास थाई मागूर माशांचे संवर्धन आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.
- थाईमागुर (Clarias gariepinus) 1989च्या अखेरीस थायलंड येथून बांगलादेशामध्ये आणण्यात आला. त्यानंतर बांगलादेशामधून बेकायदेशीररीत्या भारतामध्ये थाई मागूरचा प्रवेश झाला.
- 1997 साली केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या मत्स्यपालन विभागातर्फे थाई मागूरवर (Clarias gariepinus) बंदी घालण्यात आली होती.

**थाई मागुर माशांबद्दल :**

- भारतीय मागूर - Clarias batrachus
- थाईमागूर - Clarias gariepinus
- मोठ्या डोक्याचा मागूर Clarias macrocephalus
- महाराष्ट्रामध्ये : देशी मागूर किंवा गावरान मागूर (भारतीय मागूर)
- हा बिहार राज्याचा राज्यमासा आहे.

## 24 फेब्रुवारी : केंद्रीय अबकारी कर दिन

- भारतात दरवर्षी 24 फेब्रुवारी या दिवशी केंद्रीय अबकारी कर (किंवा उत्पादन शुल्क) दिन पाळला जातो.
- 24 फेब्रुवारी 1944 रोजी लागू झालेल्या 'केंद्रीय अबकारी कर व मीठ कायदा' याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.
- भारत सरकारच्या अबकारी कर विभागातल्या कर्मचाऱ्यांमध्ये कराविषयी जागृती निर्माण व्हावी तसेच त्यासंबंधी चांगल्या पद्धती स्वीकारण्यास चालना व प्रोत्साहन मिळावे म्हणून हा दिवस पाळला जातो, जेणेकरून निर्मिती व्यवसायात होणारा भ्रष्टाचार रोखण्यास मदत होते.

**केंद्रीय अप्रत्यक्ष कर व अबकारी कर मंडळ (CBCI) :**

- ही संस्था भारतात अबकारी कर, वस्तू व सेवा कर (GST), केंद्रीय अबकारी कर, सेवा कर वसूली आणि मादक पदार्थांना आळा यांची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असलेली एकमेव संस्था आहे.
- पूर्वी हे मंडळ 'सेंट्रल बोर्ड ऑफ एक्साइज ॲण्ड कस्टम्स' म्हणून ओळखले जात होते.
- हे मंडळ केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या महसूल विभागाचा एक भाग आहे.
- मंडळाची स्थापना 26 जानेवारी 1944 रोजी झाली.
- मुख्यालय : दिल्ली

## 27 फेब्रुवारी : मराठी भाषा दिन

- ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक, कवी व नाटककार

विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म 27 फेब्रुवारी 1912 या दिवशी झाला. त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो.

**पुरस्कार :**

- 1974 मध्ये त्यांच्या 'नटसम्राट' या नाटकाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले.
- 1987 साली ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला.
- त्यांचा विशाखा हा काव्यसंग्रह आधुनिक मराठी काव्याचे एक भूषण आहे.
- 1964 मधील गोव्याच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

## 28 फेब्रुवारी : राष्ट्रीय विज्ञान दिन

- भारताचे महान शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकट रमण यांनी प्रकाशकिरणांच्या विकिरणावरील 'रमण परिणाम' हा शोध लावल्याप्रीत्यर्थ दरवर्षी 28 फेब्रुवारीला आपण 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा करतो.
- त्यांनी हा शोध 28 फेब्रुवारी 1928 रोजी लावला. या शोधाकरिता सी. व्ही. रमण यांना 1930 मध्ये विज्ञान क्षेत्रातील सर्वोच्च नोबेल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.
- सी. व्ही. रमण यांच्या कामगिरीच्या गौरवार्थ भारतात हा दिवस 1987 सालापासून 'विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. विज्ञान दिनाचे 2020 चे हे 33 वे वर्ष आहे. तर रमण यांना नोबेल पारितोषिक मिळाल्याला 2020 मध्ये 90 वर्षे पूर्ण होत आहेत.

**भारताचे जागतिक संशोधनातील स्थान :**

- सध्या जागतिक स्तरावर 'इनोव्हेशन मानांकना'त भारत 126 देशांत 52 व्या क्रमांकावर आहे.
- तसेच संशोधन प्रकाशनाच्या बाबतीतही भारत इतर देशांच्या तुलनेत बराच मागे आहे. उत्तम रिसर्च पेपर्सच्या प्रकाशनात भारतीय वैज्ञानिकांचे प्रमाण जागतिक स्तरावर केवळ 16 टक्के आहे. तर चिनी शास्त्रज्ञांचे हेच प्रमाण 27 टक्के आहे.
- भारतीय शास्त्रज्ञांचे प्रकाशनातील प्रमाण वाढते असले तरी अमेरिकन व चिनी वैज्ञानिक प्रकाशनाबाबत भारतीयांच्या तब्बल चार पटीने पुढे आहेत.

**पेटंट :**

- चिनी वैज्ञानिक दरवर्षी सुमारे 14 लाख पेटंट (जगात सर्वाधिक) सादर करतात. तर भारतीय पेटंटचा हाच आकडा केवळ 47000 आहे आणि यातील सुमारे 68% पेटंट्स् ही अनिवासी भारतीयांद्वारे सादर केली जातात व यातील केवळ 26 टक्के पेटंट्स् अंतिम स्वरूपात स्वीकारली जातात.
- देश व विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रावर एकूण उत्पादनापैकी खर्च केली जाणारी रक्कम :

  1. दक्षिण कोरिया, इस्रायल – 4%
  2. चीन – 2%
  3. भारत – 0.7%

## ठळक घडामोडी

1) सई परांजपे यांना साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार 2019 जाहीर – नसरुद्दीन शहा यांच्या 'ॲण्ड देन वन डे' (अजून एक दिवस) या आत्मचरित्राच्या मराठी अनुवादाबद्दल परांजपे यांना हा सन्मान जाहीर.
2) करोना विषाणू साथीमुळे जागतिक अर्थव्यवस्था वृद्धीदरात दरात 0.01% घसरण होण्याची शक्यता – आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
3) सरपंचाची थेट निवड रद्द – राज्य सरकारचा निर्णय.
4) जलयुक्त शिवार योजना 31 मार्च 2020 पर्यंतच राबविली जाणार – राज्य सरकार.
5) महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ बरखास्त – राज्य सरकारची घोषणा.
6) वस्त्रोद्योग क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी नॅशनल मिशन फॉर टेक्निकल टेक्स्टाईलला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.
7) रशियाची पाच ग्रँड स्लॅम विजेती टेनिसपटू मारिया शारापोव्हा निवृत्त.
8) देशात मराठी बोलणाऱ्यांची संख्या 6.86%.
9) तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली जिल्ह्यातील जंबुकेश्वर मंदिरात 505 सुवर्णनाण्यांचा कलश आढळला.
10) अबकारी कर दिन – 24 फेब्रुवारी.
11) म्यानमारचे राष्ट्रपती यू विन मियंट भारताच्या दौऱ्यावर.
12) मर्केरियन 231 या आकाशगंगेमध्ये शास्त्रज्ञांना ऑक्सिजन वायू आढळून आला.
13) इजिप्तचे माजी अध्यक्ष होस्नी मुबारक यांचे निधन.
14) सेबीचे (भांडवली बाजाराची नियामक यंत्रणा) अध्यक्ष अजय त्यागी यांना पदकालात सहा महिने मुदतवाढ.
15) 'वरद' ही गस्ती नौका भारतीय तटरक्षक दलात दाखल.
16) कोकणातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सिंधुदुर्गला सुरू करण्यात येणार.
17) वन्यजीव, सवनसंपदेचे संरक्षण आणि वन विकासाला चालना देण्यासाठी 'वन पाटील' ही योजना 1 एप्रिलपासून राज्यातील 27 हजार गावांमध्ये सुरू करण्यात येणार.
18) परराष्ट्र मंत्रालयातर्फे 'एशिया इकॉनॉमिक डायलॉग' परिषदेचे पुण्यात आयोजन.